पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक ३५ ■ बुधवार दि. ८ जुलै २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/26/A4530 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## » थोडक्यात

### एकाच कुटुंबातील चौघांचा विजेचा धक्क्याने मृत्यू!

**सातारा :** जिल्ह्यात अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना घडली आहे. फलटण तालुक्यातील खामगाव येथे विजेचा तीव्र धक्का लागून एकाच कुटुंबातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला. हे सर्व मृत व्यक्ती पारधी समाजातील आहेत. घरासमोरील विद्युत केबलच्या उघड्या तारेला एकाचा स्पर्श झाला. एकमेकांना वाचवण्याच्या नादात कुटुंबातील इतर सदस्य पुढे सरसावले, पण काळाने त्यांच्यावरही घाला घातला. एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात या चारही जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये

### केंद्रीय मंत्रिमंडळातील फेरबदलात ५ मंत्री बदलण्याची शक्यता?

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदलाची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. २० जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. त्याआधी कधीही फेरबदल होण्याची शक्यता आहे. या मंत्रिमंडळातून निर्मला सीतारामन, हरदीप सिंग पुरी, पंकज चौधरी आणि हर्ष मल्होत्रा यांच्या खात्यात बदल किंवा मंत्रिपद जाऊ शकते असे बोलले जाते. सूत्रांच्या माहितीनुसार, मंत्रिमंडळात युवा चेहऱ्यांना संधी मिळेल.

# नगर विकास विभागाकडून आयुक्तांना थेट चौकशीचे आदेश !

**»टीडीआरच्या वापरावर आणि हस्तांतरणावर तात्काळ स्थगिती**
**»शिट नंबर २९ बेकायदेशीर गुंठेवारी, बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी**

प्रतिनिधी ८ जुलै

**अकोला :** 'सिटी न्यूज सुपरफास्ट' आणि 'आर आर सी न्यूज'ने अकोला महानगरपालिका क्षेत्रातील कोट्यवधी रुपयांच्या बेकायदेशीर गुंठेवारी, भूखंड घोटाळा आणि टीडीआर च्या गैरवापराचे प्रकरण अत्यंत आक्रमकपणे लावून धरले होते. वृत्तवाहिनी आणि वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या पुराव्यांमुळे या संपूर्ण घोटाळ्याचा पर्दाफाश झाला आणि आता या प्रकरणात 'महा-इम्पॅक्ट' पाहायला मिळत आहे. या वृत्तमालिकेची थेट नगर विकास मंत्रालयाने गंभीर दखल घेतली असून, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अकोला महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

मंत्रालयातून जारी झालेले अधिकृत आदेश महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव प्रसाद रा. शिंदे यांच्या स्वाक्षरीने अकोला महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवण्यात आले आहे. या पत्रात खालील दोन प्रमुख विषयांवर तातडीने प्रशासकीय आणि चौकशीची कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. अकोला महानगरपालिकेद्वारे जारी करण्यात आलेल्या डीआरसी क्र. ३२ अंतर्गत टीडीआरच्या वापरावर आणि हस्तांतरणावर तात्काळ स्थगिती देण्याबाबत. शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय परिसराजवळ, कै. बाळासाहेब ठाकरे उद्यानाच्या मागे असलेल्या शिट क्र. २९ अ आणि २९ बी मधील १४ एकर शासकीय मालकीच्या, परंतु भाडेपट्टा संपलेल्या जमिनीवर झालेल्या बेकायदेशीर गुंठेवारी आणि बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत नगर विकास विभागाने आदेश काढत चौकशीचे सुरु केली आहे. काँग्रेस विधी मंडळ नेते आ. विजय वडेट्टीवार यांनीही या ओपन स्पेस व भूखंड घोटाळ्यावरून सरकारला धारेवर धरले आहे. 'नियम डावलून जागा घशात घालणाऱ्यांची संपूर्ण यादी माझ्याकडे असून, यात नझुल, महसूल, भूमी अभिलेख आणि महानगरपालिका या चारही यंत्रणांचे लागेबांधे आहेत,' असा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची विशेष चौकशी समिती मार्फत चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### शासकीय जमिनीची खाजगी म्हणून विक्री

शिट नंबर २९ अ आणि २९ ब मधील १४ एकर मौल्यवान शासकीय जमीन पूर्वी केवळ जिनिंग फॅक्टरीसाठी भाडेपट्ट्याने दिली होती. भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतरही स्थानिक महसूल आणि महानगरपालिकेतील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांशी संगनमत करून ही जमीन खाजगी असल्याचा बनाव रचण्यात आला व बेकायदेशीर गुंठेवारी मंजूर करून घेण्यात आली. पाटबंधारे विभागाच्या नियमांनुसार हा भाग पूर नियंत्रण क्षेत्र आणि हरित क्षेत्र मध्ये येत असतानाही, सर्व नियम केराची टोपली दाखवून या भागात आलिशान बंगले आणि व्यावसायिक संकुलांचे बेकायदेशीर बांधकाम सुरू करण्यात आले.

### गुन्हे दाखल करण्याचे आदेश कोण देणार

या सर्व प्रकरणात सरकारी जागा घेत त्या खाजगी असल्याचे दाखवित त्यावर गुंठेवारी करत कोट्यावधीचे बंगले उभारले आहे. इतकेच नाही तर एस एस रुबी, एस एस पर्ल, एस एस डायमंड नावाच्या इमारती उभारण्यात आल्या असून त्यांना सरकारी जमीनवर फ्लॅट निर्माण करत फ्लॅट धारकांची कोट्यावधीची फसवणूक करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणात ज्या भूमी अभिलेख, उपजिल्हाधिकारी आणि महापालिकेच्या नगर रचना विभागाने हात ओले केले. बोगस आखिव पत्रिका (पीआर कार्ड) तयार केले. त्यांच्यावर सरकारच्या फसवणूकीचे गुन्हे दाखल करत त्वरीत सर्व विभागांनी संबंधितांना बडतर्फ केले पाहिजे.

## कोट्यवधींच्या भूखंड घोटाळ्याची राज्य सरकारकडून गंभीर दखल

## सिटी न्यूज सुपरफास्ट व आर आर सी न्यूजचा सर्वात मोठा 'इम्पॅक्ट'!





### घोटाळेबाजांनी याचा घेतला फायदा

एक हेक्टर पेक्षा कमी जागा दाखवून येथे गुंठेवारी करण्यात आली. ३९आर मोजणी दाखवित भूमि अभिलेख विभागाने यातील ओपन स्पेस, सार्वजनिक वापराची जागा वगळण्यास मदत केली. इतक्यावर हे प्रकरण थांबले नाही तर उपविभागीय अधिकारी आणि महापालिकेच्या नगर रचनाकार यांनी मोलाची भूमिका बजावल्याची माहिती समोर येत आहे. नझुल लँडची गुंठेवारी करत शासनाला चुना लावल्याचे चित्र आहे. अशा प्रकारे शासनाच्या जागेवर किती गुंठेवारी करण्यात आल्या. त्याच बरोबर ३९ आर अंतर्गत लेआऊट न टाकता गुंठेवारीचे असे किती प्रकरण भूमि अभिलेखने अकोल्यात विकसित केले याचा ही शोध राज्य शासनाने घेण्याची गरज आहे. कारण, यात शासनाच्या कोट्यावधीचा महसुल बुडविल्याचे चित्र असून स्थानिकांच्या ओपन स्पेस बळकावल्या आहे.

# कोण कुणाला फसवित आहे ? आज सात बारा केला बंद

**»घरकुलची जागा केंद्रीय विद्यालयाचे प्रकरण**
**»सात बारावर थेट गावठाण आणि १३६ प्लॉट चा उल्लेख**

प्रतिनिधी ८ जुलै



**अकोला:** गुडधी येथील घरकुलाच्या जागेवर केंद्रिय विद्यालयास मंजुरीच्या विषयात धक्कादायक माहिती समोर येत असून या गाठवाणाची उल्लेख सात बारा वर घेतला असताना ही जागा केंद्रिय विद्यालयास कशी काय देण्यात आली असा ही प्रश्न उपस्थित होतो. सन २०२४ पर्यंत लाभार्थ्यांकडे असलेल्या सात बारावर त्याची नोंद आहे. घरकुल लाभार्थ्यांना जमीन दिली पण, ती कोणाला कुठे दिली याचा कुठलाही आदेश स्थानिक महसुल प्रशासनाने काढला नव्हता. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांनी जमीन ताब्यात घेतली नाही. २८ जून २०२६ रोजी हा फेरफार बदलण्यात आला, आजच्या तारखेत हा सात बारा बंद करण्यात आला असला तर गावकऱ्यांजवळ लाभार्थ्यांजवळ असलेल्या सात बारा मध्ये गावठाणातून १३६ प्लॉट घरकुलासाठी वळते केल्याची नोंद आहे. ही शासकीय नोंद असताना केंद्रिय विद्यालयासाठी देण्याचा प्रस्ताव आला. शासकीय पातळीवर याची शहानिशा का केल्या गेली नाही. केंद्र सरकारने मोठ्या उत्साह केंद्रिय विद्यालय दिले आणि अकोल्यातील स्थानिक प्रशासनाला कुठलाही बोजा नसलेली पाच एक्कर पेक्षा अधिक जागा या विद्यालयासाठी उपलब्ध करुन देता आली नाही. हे मोठे अपयश अकोल्यातील प्रशासनाचे आहे. लाभार्थ्यांनी एक वर्षाच्या कालावधीत ही जमीन ताब्यात का घेतली नाही असा महत्वाचा मुद्दा सरकारचा आहे. पण, मग शासनाने जमीन परत घेत आहे असे पत्र कुठे दिले अशी विचाणा घरकुल लाभार्थी करत आहे. असे असताना आता ही जमीन केंद्रिय विद्यालयास दिल्यानंतर लाभार्थी समोर आले आहे.

## विदर्भाचे डॉ. सुरेश हावरे यांची रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र निवड समितीच्या सदस्यपदी नियुक्ती

प्रतिनिधी ८ जुलै



**अमरावती :** विदर्भ समाज संघ मुंबईचे प्रमुख सल्लागार, उद्योगपती, श्री. साई बाबा संस्थान शिर्डीचे माजी अध्यक्ष, अमरनाथ संस्थेचे विश्वस्त डॉ. सुरेश हावरे यांची रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र निवड समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

अयोध्येतील श्री. रामजन्मभूमी ट्रस्टचे नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यासंबंधीच्या समितीवर डॉ. सुरेश हावरे यांची नियुक्ती झाल्याची घोषणा सोमवारी झाली. साई समाधी शताब्दी वर्ष त्यांच्या कारकिर्दीतच पार पडले. कुशल नेतृत्व, कल्पक नियोजन, आणि देखणे आयोजन यामुळे तो सोहळा देशातच नव्हे तर जगभरात नावाजला गेला. महामहीम राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांनी या सोहोळ्यातच शिर्डीला भेट देऊन डॉ. हावरे यांच्या कल्पक नियोजनाचे आणि शिर्डीत त्यांनी राबवलेल्या विविध योजनांचे कौतुक केले होते. विदर्भातील एका खेड्यातून मुंबईत आलेले सुरेश हावरे भाभा अणुशक्ती केंद्रात २७ वर्ष संशोधक होते.

## अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात बंद दाराआड चर्चा!

**दिल्ली :** राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल दिल्ली दौऱ्यावर होते. यादरम्यान अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. नर्मदा प्रकल्पाच्या मुद्याच्या बैठकीत गुजरातचेही मुख्यमंत्री उपस्थित होते. आता राज्याला नर्मदा नदीचे पाणी मिळणार आहे. नर्मदा प्रकल्पाच्या बैठकीनंतर अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात एक स्वतंत्र बैठक झाली. बंद दाराआड अनेक मुद्यांवर या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती मिळतंय. ही एक स्वतंत्र बैठक झाली.

# सरकारच्या चुकलेल्या आदेशात होईल काय बदल

## वर्धेतील दोघांचा जिल्हा नियोजन समितीत समावेश

प्रतिनिधी ८ जुलै

**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने अकोला जिल्हा नियोजन समितीवर नवीन सदस्यांची नियुक्ती जाहीर केली आहे. मात्र, या नियुक्तीमध्ये अकोला जिल्ह्याशी थेट संबंध नसलेल्या शेजारील जिल्ह्यातील व्यक्तींना स्थान देण्यात आल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात आणि अकोलेकरांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. या यादीतील धक्कादायक बाब म्हणजे, अकोला जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन करणाऱ्या या समितीत चक्क वर्धा जिल्ह्यातील दोन व्यक्तींना 'विशेष निमंत्रित' म्हणून संधी देण्यात आली आहे. पण, मुळात हे दोघे ही अकोल्यातील असताना त्यांना वर्धाचे रहिवासी का दाखविले गेले. हा ही प्रश्न उपस्थित होत आहे. श्रीमती रेखा संजय राऊत, विठ्ठल सरप पाटील या दोन्ही नेत्यांची नावे अकोला जिल्हा नियोजन समितीच्या अधिकृत विवरणपत्र अ मध्ये विशेष निमंत्रित म्हणून समाविष्ट करण्यात आली आहेत. या दोघांना वर्ध्येतील का दाखविले गेले असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हा नियोजन समिती ही जिल्ह्याच्या वार्षिक निधीचे वाटप, स्थानिक विकासकामे आणि पायाभूत सुविधांचे नियोजन करणारी अत्यंत महत्त्वाची संस्था आहे.




# अकोला अशोक वाटिका चौकात ट्रॅफिकची ऐशी तैसी

## एस.टी. चालक-वाहकांकडून अपघाताला निमंत्रण

प्रतिनिधी ८ जुलै



**अकोला :** शहरातील अत्यंत गजबजलेला आणि मुख्य चौक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक वाटिका चौकात सध्या वाहतूक नियमांची सर्रास ऐशी तैसी केली जात असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. मुख्य बस स्थानक अगदी हाकेच्या अंतरावर म्हणजेच हाकेच्या अंतरावर असतानाही, एस.टी.चे चालक आणि वाहक थेट अशोक वाटिका चौकातच बस थांबवून प्रवाशांना उतरवण्याचा जीवघेणा उद्योग करत आहेत. या बेजबाबदार प्रकारामुळे चौकात कधीही मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून 'अपघात झाल्यास जबाबदार कोण?' असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून विचारला जात आहे. अशोक वाटिका चौक हा शहरातील अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे. येथून अवजड वाहनांसह शेकडो दुचाकी आणि चारचाकी वाहने सातत्याने धावत असतात. अशा गजबजलेल्या चौकात अचानक मधोमध लालपरी (एस.टी. बस) थांबवली जात असल्याने पाठीमागून येणाऱ्या वाहनांना अचानक ब्रेक लावावा लागतो. यामुळे अनेकदा वाहने एकमेकांवर आदळण्याची स्थिती निर्माण होते.

### बसस्थानक जवळ असताना हा खटाटोप कशासाठी ?

विशेष म्हणजे मध्यवर्ती बसस्थानक येथून अगदी जवळ आहे. प्रवाशांना सुरक्षितपणे बसस्थानकात उतरवणे कायदेशीर आणि सोयीचे असतानाही, चालक आणि वाहक केवळ प्रवाशांच्या सोयीचे कारण पुढे करून किंवा स्वतःचा वेळ वाचवण्यासाठी थेट चौकातच बस उभी करण्याचे धाडस दाखवत आहेत. भर चौकात रस्त्याच्या मध्यभागी प्रवाशांना उतरवणे म्हणजे त्यांच्या थेट जीवाशी खेळण्यासारखेच आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची मागणीया प्रकारामुळे अशोक वाटिका चौकात वाहतूक कोंडी तर होतेच, पण त्यासोबतच पादचारी आणि इतर वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. एस.टी. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि शहर वाहतूक पोलिसांनी या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी.

# स्वत:चे स्वतंत्र चिन्ह असलेला भारत हा जगातील पाचवा देश

## 8 जुलैला स्वीकारले होते नवीन चिन्ह

८ जुलै २०११ रोजी भारतीय रुपयाचे नवीन चिन्ह (₹) असलेली नाणी प्रथमच अधिकृतपणे चलनात आली. हे चिन्ह डी. उदय कुमार यांनी डिझाइन केले असून, भारत सरकारने १५ जुलै २०१० रोजी ते अधिकृतपणे स्वीकारले होते. या चिन्हाचा वापर आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय चलनाची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी केला जातो. सध्या चलनात असलेल्या सर्व नाण्यांवर हे चिन्ह कोरलेले असते. भारतीय रुपयाच्या '₹' या चिन्हाचा इतिहास अत्यंत रंजक असून त्याच्या डिझाइनमध्ये भारताची संस्कृती आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम साधला आहे. २०१० पूर्वी भारतीय रुपयासाठी 'आरएस' किंवा 'आरई' असे संक्षिप्त रूप वापरले जात होते. परंतु, पाकिस्तान, नेपाळ आणि श्रीलंका या देशांच्या चलनाचे नावही रुपयाच असल्याने जागतिक स्तरावर भारताची स्वतंत्र ओळख नव्हती. भारत सरकारने २००९ मध्ये रुपयासाठी एक नवीन चिन्ह शोधण्यासाठी देशव्यापी खुली स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत ३ हजारांहून अधिक डिझाइन्स आली होती. आयआयटी बॉम्बेचे पोस्ट-ग्रॅज्युएट विद्यार्थी डी. उदय कुमार यांनी तयार केलेले डिझाइन सर्वोत्कृष्ट ठरले. केंद्रीय मंत्रिमंडळाने १५ जुलै २०१० रोजी या चिन्हाला अधिकृत मंजुरी दिली. यामुळे डॉलर, पाउंड, युरो आणि येन प्रमाणे स्वतःचे स्वतंत्र चिन्ह असलेला भारत हा जगातील पाचवा देश बनला.

### चिन्हाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

हे चिन्ह भारतीय आणि पाश्चात्त्य लिपींचे मिश्रण करून तयार केले गेले आहे. हे चिन्ह देवनागरी लिपीतील 'र' आणि रोमन (इंग्रजी) लिपीतील 'R' (उभी रेघ नसलेला) एकत्र करून बनवले आहे. '₹' म्हणजे रुपया आणि '₹' म्हणजे. चिन्हाच्या वरच्या बाजूला असलेल्या दोन आडव्या समांतर रेषा आणि त्यांच्यामधील पांढरी जागा भारताच्या तिरंग्याची आठवण करून देते. वरच्या दोन समांतर रेषा गणितातील 'समानतेचे' (₹) चिन्ह दर्शवतात. हे देशातील आर्थिक विषमता कमी करण्याची आणि समता राखण्याची भारताची

### भाषा पॅनेलचा इतिहास

भारताच्या चलनी नोटांवर असलेल्या भाषेच्या पॅनेलला 'भाषा पॅनेल' म्हटले जाते. हे पॅनेल भारताच्या भाषिक विविधतेचे आणि विविध संस्कृतींचे प्रतीक आहे. या पॅनेलबद्दलची महत्त्वाची आणि रंजक माहिती

१. एकूण भाषा किती असतात?१५ भाषा पॅनेलमध्ये: नोटेच्या मागच्या बाजूला एका उभ्या चौकटीत (पॅनेल) १५ वेगवेगळ्या भारतीय भाषांमध्ये नोटेचे मूल्य (उदा. 'शंभर रुपये') लिहिलेले असते. नोटेच्या मुख्य (पुढच्या) भागावर हिंदी आणि इंग्रजी या दोन भाषा प्रामुख्याने वापरल्या जातात. त्यामुळे जर संपूर्ण नोटेचा विचार केला, तर भारतीय नोटेवर एकूण १७ भाषांचा वापर केला जातो.

२. भाषा पॅनेलमध्ये कोणत्या १५ भाषा आहेत : या पॅनेलमध्ये भारताच्या घटनेतील ८ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या २२ भाषांपैकी १५ भाषांना स्थान मिळाले आहे. या भाषा अक्षरक्रमानुसार खालीलप्रमाणे लावलेल्या असतात. असामी,

### रूपयाचा उगम

'रुपया' या शब्दाचा इतिहास खूप जुना आहे. त्याचा उगम 'रौप्य' या संस्कृत शब्दापासून झाला आहे. 'रौप्य' म्हणजे चांदी आणि 'रुप्यकम्' म्हणजे चांदीचे नाणे.भारतातील चलनाशी संबंधित काही अत्यंत मनोरंजक ऐतिहासिक तथ्ये आहेत.

१) शेरशाह सुरीचे योगदानपहिला रुपया : आधुनिक रुपयाचा इतिहास १६ व्या शतकात सुरू होतो. सुलतान शेरशाह सुरी (१५४०-१५४५) याने त्याच्या राजवटीत पहिले चांदीचे नाणे चलनात आणले. या नाण्याचे वजन १७८ ग्रेन (जवळपास ११.५३ ग्रॅम) होते. त्याने या नाण्याला 'रुपिया' असे नाव दिले.

२) पहिली कागदी नोट : भारतात नाण्यांऐवजी कागदी नोटा छापण्याची सुरुवात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. १७७० मध्ये 'बँक ऑफ हिंदुस्तान' ने भारतातील पहिली कागदी नोट जारी केली होती.

३) १ रुपयाची पहिली नोटअनोखी नोट : १ रुपयाची पहिली नोट ३० नोव्हेंबर १९१७ रोजी छापण्यात आली. त्यावर किंग जॉर्ज पाचवे यांचे चित्र होते. आजही भारताच्या सर्व नोटांवर रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची स्वाक्षरी असते, पण १ रुपयाच्या नोटेवर भारताच्या वित्त सचिवांची स्वाक्षरी असते. ४) आना आणि पैशांचे गणित१९५७ पूर्वी : भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही काही काळ जुनी पद्धत सुरू होती. तेव्हा १ रुपया म्हणजे १६ आणे, १ आणा म्हणजे ४ पैसे आणि १ पैसा म्हणजे ३ पाय असे गणित होते.१ एप्रिल १९५७ रोजी भारताने 'दशमान पद्धत' स्वीकारली. त्यानंतर १ रुपयाचे १०० पैसे झाले. ५) गांधीजींचे चित्र कधी आले?अशोक स्तंभ : स्वातंत्र्यानंतर सुरुवातीला नोटांवर ब्रिटनच्या राजाऐवजी 'अशोक स्तंभाचे' चित्र छापले जात होते. १९६९ मध्ये महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पहिल्यांदा नोटेवर त्यांचे चित्र (सेवाग्राम आश्रमातील बसलेला फोटो) छापण्यात आले. सध्या आपण जो गांधीजींचा हसरा चेहरा पाहतो, तो १९९६ पासून नियमित वापरला जाऊ लागला.

# वारीतील 'जेवण' आणि माणुसकीचा गोडवा!!



आषाढी वारी म्हणजे केवळ पंढरपूरकडे चालणारा लाखो वारकऱ्यांचा प्रवास नव्हे, तर तो माणुसकी, समता, सेवा आणि परस्पर प्रेमाचा चालता-बोलता विद्यापीठ आहे. वारीत चालणारा प्रत्येक वारकरी, प्रत्येक दिंडी, प्रत्येक अन्नछत्र आणि प्रत्येक प्रसाद आपल्याला एकच संदेश देतो"जे आहे ते वाटून खा; कारण वाटल्यानेच जीवन गोड होते."

अलीकडे समाजमाध्यमांवर प्रसारित झालेली "वारीतला शिरा आणि डोळ्यातलं पाणी" ही कथा याच मूल्यांना स्पर्श करते. कथेतला शिरा हा केवळ गोड पदार्थ राहत नाही; तो माणुसकीचा, करुणेचा आणि त्यागाचा प्रसाद बनतो. एका लहान मुलाला स्वतःच्या वाट्याचा घास देणारा तरुण आणि तोच घास पुन्हा चार जणांत वाटणारा निरागस बालक आपल्याला शिकवून जातात की, खरी श्रीमंती पैशात नसते, ती मनाच्या उदारपणात असते.

आजच्या डिजिटल युगात अनेक जण वारीकडे कॅमेऱ्याच्या नजरेतून पाहतात. फोटो, व्हिडिओ, रील आणि व्ह्लॉग यांच्या माध्यमातून वारी टिपण्याचा प्रयत्न होतो. त्यात गैर काहीच नाही; परंतु वारीचा खरा अनुभव कॅमेऱ्यात कैद होत नाही. तो हृदयात उतरतो. वारी शिकवते की, "लाईक" आणि "फॉलोअर्स" यापेक्षा सहप्रवाशाच्या चेहऱ्यावरचे समाधान अधिक मौल्यवान असते.

वारीतील अन्नदानाची परंपरा ही भारतीय संस्कृतीतील सर्वोच्च सेवांपैकी एक आहे. हजारो अन्नछत्रे कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता वारकऱ्यांची सेवा करतात. कोण श्रीमंत, कोण गरीब, कोण मोठा, कोण लहान याचा भेद नसतो. एकाच पंगतीत सर्वजण प्रसाद ग्रहण करतात. ही समतेची शिकवण आजच्या समाजालाही तितकीच आवश्यक आहे.

या कथेतल्या मुलाने स्वतःचा घास शेजाऱ्याला दिला. हा प्रसंग काल्पनिक असो वा वास्तव, त्यामागचा संदेश अत्यंत खरा आहे. कारण वारीत प्रत्येक वारकरी दुसऱ्याचा आधार असतो. थकलेल्याला हात देणे, तहानलेल्याला पाणी पाजणे, भुकेल्याला अन्न देणे आणि दुःखी माणसाला धीर देणे—हीच खरी विठ्ठलभक्ती आहे.

आज समाजात स्पर्धा, स्वार्थ आणि एकटेपणा वाढताना दिसतो. अशा काळात वारी आपल्याला "मी" पासून "आपण" पर्यंतचा प्रवास घडवते. म्हणूनच वारी शेकडो वर्षांपासून अखंड सुरू आहे. ती कोणत्याही जाहिरातीवर चालत नाही; ती श्रद्धा, प्रेम आणि सेवाभावावर चालते.

आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने एक संकल्प करावा आपल्या सोबत एक अतिरिक्त डबा, पाण्याची बाटली, बिस्किटांचे पाकीट किंवा एखादा प्रसाद घेऊन जावा. वाटेत भेटणाऱ्या गरजू वारकऱ्याला तो प्रेमाने द्यावा. कदाचित तो एक छोटासा घास कोणाच्या आयुष्यातील सर्वात मोठा आनंद ठरेल.वारी शिकवते की, पोट भरल्याने माणूस जगतो; पण मन भरल्याने समाज जगतो. शिरा संपतो, प्रसाद संपतो, जेवण संपते, प्रवास संपतो; परंतु प्रेमाने दिलेला एक घास आयुष्यभर स्मरणात राहतो. म्हणूनच पंढरीची वाट ही केवळ पायांनी चालायची नसते, ती करुणा, सेवा आणि परस्पर प्रेमाने तुडवायची असते.

याच विचाराने प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारावा—या वर्षी मी वारीत किती चाललो, यापेक्षा मी किती वाटले? कारण विठ्ठलाला पोहोचण्याचा सर्वात जवळचा मार्ग मंदिरातून नाही, तर दुसऱ्याच्या चेहऱ्यावर उमटलेल्या समाधानाच्या हास्यातून जातो.

**गजानन ओंकारराव हरणे.**
वारकरी समाजसेवक, अकोला
मोबाईल नंबर.9822942623.

# पनीर : आजारांचे सर्वात मोठे कारण ?



माणसाने स्वतःला कितीही आधुनिक बनवले, तरी त्याला त्याच्या जुन्या ज्ञानाकडे परत जावेच लागेल. कारण आधुनिक विज्ञान अपूर्ण आहे आणि प्राचीन संशोधन पूर्णपणे परीक्षित आणि हानिरहित आहे.

आता बोलूया आजच्या सर्वात प्रसिद्ध अन्नाबद्दल म्हणजेच पनीरबद्दल. भारतीय लोक पनीरचे इतके वेडे झाले आहेत की, जिथे कुठे ते मिळेल तिथे बाकीचे सर्व सोडून आनंदाने फक्त पनीर खाणे सुरू करतात.

जेव्हा ते हॉटेलमध्ये जातात, तेव्हा पनीर खाल्ल्याशिवाय घास खाली उतरत नाही. कढई पनीर, शाही पनीर, मटर पनीर, चिली पनीर आणि पनीरचे बरेच प्रकार. समोशामध्ये पनीर, पकोड्यांमध्ये पनीर, पिझ्झामध्ये पनीर, बर्गरमध्ये पनीर, म्हणजेच जिथे पाहावे तिथे पनीरच पनीर आहे.

भारत जितके दुधाचे उत्पादन करतो, त्यापेक्षा कदाचित जास्त पनीरचे उत्पादन करतो.

वैद्यकशास्त्राचे सर्वात जुने रूप असलेल्या आयुर्वेदात दूध, दही आणि तुपाचा उल्लेख प्रत्येक ठिकाणी आढळतो, पण या नकोशा पनीरचा कुठेही उल्लेख नाही. शेवटी असे का?

जर पनीर इतके चांगले आहे, तर मग कोणत्याही ऋषींनी याबद्दल काही का लिहिले नाही?

जेव्हा आम्ही याचा सखोल तपास केला, तेव्हा आम्हाला समजले की...

आयुर्वेदात पनीरचे वर्णन सर्वात वाईट अन्न म्हणून केले गेले आहे. कचरा मानला गेला आहे. आणि कचराही असा की तो प्राण्यांनाही खाऊ घालण्यास मनाई आहे.

पनीर दुधाला नासवून किंवा त्याचे रूप विकृत करून बनवले जाते.

उदाहरणार्थ, जर एखादी भाजी सडली, तर ती आपण खाऊ का? पनीर म्हणजे सुद्धा सडलेले दूधच आहे.

भारतीय इतिहासात कुठेही पनीरचा उल्लेख नाही, तसेच हा भारतीय पदार्थ नाही. कारण भारतात प्राचीन काळापासून दूध नासवण्यावर किंवा खराब करण्यावर बंदी आहे. आजही ग्रामीण समाजात घरातील महिला कधीही स्वतःहून दूध नासवत नाहीत.

पनीर खाण्याचे तोटे...

आयुर्वेदाने सुरुवातीपासूनच सांगितले आहे की खराब झालेले दूध लिव्हर (यकृत) आणि आतड्यांना नुकसान पोहोचवते. पण आता आधुनिक विज्ञानानेही आपल्या संशोधनात सिद्ध केले आहे की पनीर खाल्ल्याने आतड्यांवर अतिरिक्त दाब पडतो, ज्यामुळे पचनाचे आजार होतात.

प्राण्यांमध्येही पनीरमध्ये असणारे प्रोटीन पचवण्याची क्षमता नसते. मग माणूस ते कसे पचवणार?

याचा परिणाम म्हणजे भयंकर बद्धकोष्ठता (Constipation), फॅटी लिव्हर आणि नंतर हाय कोलेस्ट्रॉल, हाय ब्लड प्रेशर आणि डायबिटीस. हे पनीर पोटाचा धोकादायक आजार IBS (इरिटेबल बॉवेल सिंड्रोम म्हणजेच संवेदनशील आतड्यांचा आजार) चे कारण देखील बनते.

जास्त पनीर खाल्ल्याने रक्ताच्या गाठी तयार होतात, ज्यामुळे ब्रेन हॅमरेज आणि हार्ट फेल्युअर देखील होऊ शकते.

त्याच वेळी, हे पनीर हार्मोनल असंतुलनाचे कारण देखील बनू शकते, ज्यामुळे हायपोथायरॉईडीझम किंवा हायपरथायरॉईडीझम (थायरॉईडचे आजार) देखील होऊ शकतात.

महिलांची गर्भधारणा करण्याची क्षमता कमी होते आणि पुरुष नपुंसकतेचे बळी ठरतात.

एकंदरीत विचार केला तर पनीर फक्त जिभेला चव देते पण संपूर्ण शरीराचे नुकसान करते.

त्यामुळे पुढच्या वेळी पनीर खाण्यापूर्वी नक्की विचार करा.

# निर्व्यसनी समर्थ समाजाचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी आयुष्य वेचणारे!

## नाना धर्माधिकारी यांची आज पुण्यतिथी



डॉ. नारायण विष्णू धर्माधिकारी ऊर्फ नानासाहेब धर्माधिकारी यांचा जन्म १ मार्च १९२२ रोजी तर मृत्यू ८ जुलै २००८ हे समर्थ रामदासांच्या दासबोधाचे निरूपणकार होते. त्यांनी आयुष्यभर अध्यात्म, शिक्षण, आरोग्य, समाजप्रबोधन व व्यसनमुक्ती क्षेत्रांत निरलसपणे कार्य केले. नानासाहेब धर्माधिकारी यांचे जगभरात लाखो अनुयायी आहेत. नानासाहेब धर्माधिकारी यांचे शिक्षण मराठी चौथीपर्यंत झाले. रेवदंड्याच्या शाळेत ते शिकत होते. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय हस्तसामुद्रिक (हात पाहून भविष्य सांगणे) हा होता. धर्माधिकाऱ्यांच्या घराण्यात चारशे वर्षांपासून समाजप्रबोधनाच्या कार्याची परंपरा आहे. त्यांच्या घराण्याचे मूळचे आडनाव 'शांडिल्य' असे होते. त्यांच्या भूतकाळातल्या आठव्या पिढीतील पूर्वज गोविंद चिंतामण शांडिल्य ऊर्फ शांडिल्य हे धर्मजागृतीचे काम स्वेच्छेने करायचे. त्याकाळचे दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांनी त्यांना सन्मानाने 'धर्माधिकारी' अशी पदवी दिली. तेव्हापासून आजतागायत त्यांचे घराणे धर्माधिकारी हे आडनाव लावत आले आणि त्याला समर्पक असे धर्मजागृतीचे काम करीत आले. डॉ. नानासाहेबांनी आपल्या पित्याकडून प्रेरणा घेऊन, प्रसिद्धीपासून दूर राहून समाजाचे प्रबोधन करण्याचे सेवाव्रत घेतले आणि ते अव्याहतपणे चालवले. त्यांचे चिरंजीव डॉ. दत्तात्रेय तथा अप्पासाहेब व नातू डॉ. सचिनदादा यांनीही नानांच्याच कार्याला वाहून घेतले आहे. त्यांचे पुत्र पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांनी या समाजप्रबोधनाच्या कार्याची धुरा वडिलांच्याच निष्ठेने आणि तळमळीने स्वतः करीत आहेत.

धर्माचरणाविषयी बोलताना, त्या अनुषंगाने समाजाला सन्मार्गाला लावण्याची शिकवण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी देत गेले. आधुनिक संदर्भात दासबोधाच्या कमालीच्या सोप्या निरूपणातून विकारी मनांची मशागत करताना निर्व्यसनी समर्थ समाजाचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. धर्म अर्थ काम आणि मोक्ष ह्या असा सर्वांगीण पुरुषार्थाची ओळख त्यांनी स्वतःची ओळख विसरलेल्या समाजाला करून दिली व आजही हे कार्य निष्काम त्यांचे सुपुत्र पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी व नातू रायगड भूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यशस्वीरीत्या करत आहेत. या कामासाठी त्यांनी १९४३ साली रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथे श्रीसमर्थ आध्यात्मिक प्रासादिक सेवा समिती स्थापन केली. या माध्यमातून सोमवार ८ ऑक्टोबर १९४३ ( विजयादशमी ) रोजी मुंबई येथील गोरेगाव येथे प्रथम श्रीबैठक सुरू करण्यात आली. या संस्थेद्वारे त्यांनी जगभरात अध्यात्माचा प्रसार केला. त्याच्या शाखा आज भारताबाहेरील अनेक देशांपर्यंत पसरल्या आहेत.

त्या संस्थेमध्ये आजघडीला मराठी बरोबरच हिंदी, उडिया, तामिळ, बंगाली, कन्नड व इंग्रजीतून निरूपण केले जाते. सुरुवातीला महिला व पुरुषांचीच बैठक होत असे. मात्र, बालवयापासूनच संस्कार व्हावेत म्हणून बालोपासना सुरू करण्यात आली. अध्यात्माचे धडे देतानाच नानांनी शेकडो खेडी, आदिवासी पाड्यांची भ्रमंती करून लोकांना व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून दिले होते. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, अज्ञान, स्त्रियांवरील अत्याचार, जातिभेद अशा कुप्रवृत्तींवर जोरदार प्रहार करत नानांनी सद्गुणांची पेरणी केली. त्यामुळे लाखो लोक व्यसनमुक्त होऊन परमार्थाकडे वळले.

इ.स २००८ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. नानासाहेब धर्माधिकारी यांचे सुपुत्र आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी

# पावसाचा कहर अन विस्कळीत जनजीवन



मुंबई. मुसळधार पावसाने मुंबई, पुणे, ठाणे, पालघर आणि कोकण किनारपट्टीसह अनेक भागात अक्षरशः कहर केला आहे. सखल भागात पाणी साचल्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे, वाहतूक कोंडी व दरड कोसळण्याच्या घटना घडत आहेत. हवामान विभागाने (IMD) अनेक जिल्ह्यांत 'रेड' व 'ऑरेंज' अलर्ट जारी केला आहे. राज्यातील पावसाची सद्यस्थितीमुंबई आणि उपनगर मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले असून लोकल सेवा कोलमडली आहे.

अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या आणि भिंती कोसळण्याच्या दुर्दैवी घटना समोर आल्या आहेत.

पुणे शहरासह मुळशी आणि भोर तालुक्यांत पावसाने रौद्ररूप धारण केले आहे. काही सोसायट्या व गावांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले आहे.कोकण आणि उर्वरित महाराष्ट्र: पालघर (उदा. विरार), ठाणे आणि रायगड पट्ट्यात सलग पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत.⊠ प्रशासकीय सूचना व खबरदारीप्रशासकीय पावले: आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्यभरात बचाव पथके आणि एनडीआरएफ (NDRF) तैनात करण्यात आली आहेत.नागरिकांना अतिवृष्टीचा इशारा लक्षात घेता, अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे असे आवाहन केले आहे.

# फक्त वृक्षारोपण करून फायदा नाही

दरवर्षी उन्हाळा आला, तापमान असह्य झाले. पावसाळ्यात पाऊस कमी झाला की, आपल्याला देशात वृक्षांची संख्या खूप कमी आहे. निर्दयपणे वृक्षतोड सुरू आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला असल्यानं, अशी भिषण परिस्थिती निर्माण झाल्याची प्रकर्षाने जाणीव होते. वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रातून ओरडा सुरू होतो. शासन, संघटना आणि नागरिक खडबडून जागे होतात. वृक्षारोपणा च्या मोहीम राबविण्यात येतात. जागतिक सरासरी ४२२ वृक्ष, प्रती व्यक्ती आहे. आपल्या देशात दरडोई वृक्षांची संख्या फक्त २८ आहे. इतर देशांमधील दरडोई वृक्षांची संख्या, कॅनडा ८९५३, रशिया ४४६१, अमेरिका ७१६, ब्राझील १४९४ आणि चीन १०२ अशी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केंद्र तसेच देशातील सर्व राज्य सरकार दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाची मोहीम राबवतात. काही राज्य सरकार शेतकरी आणि नागरिकांना योजने अंतर्गत वृक्षारोपण केलेल्या, वृक्षांच्या देखभालीसाठी भत्ता देखील देतात. केंद्र सरकार तर्फे ग्रीन इंडिया मिशन, नगर वन योजना, एक पेड मां के नाम तसेच महाराष्ट्र राज्य, हरित महाराष्ट्र योजना राबवते. महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२६ ते २०३१ या ५ वर्षाच्या काळात ३०० कोटी झाडांची लागवड करण्याचे मोठे उद्दिष्ट ठेवले आहे. या योजनेच्या अंतर्गत दरवर्षी ६० कोटी झाडे लावली जातील. शासना तर्फे शेतकरी, नागरिक आणि सामाजिक संघटनांना वृक्षारोपण करण्याचे आवाहन करण्यात येते. मोफत अथवा नाममात्र दरात रोपं पुरवली जातात. आपण वृत्तवाहिन्यांवर तसेच वृत्तपत्रातून वृक्षारोपणा च्या कार्यक्रमांचे फोटो, बातम्या बघतो आणि वाचतो. या वरुन दरवर्षी आपल्या देशात किमान १००० कोटी झाडांची लागवड होत असावी असा अंदाज आहे. परंतू दिवसेंदिवस पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. दिवसरात्री च्या तापमानात वाढ होते आहे. वादळं, भुस्खलन, अवकाळी पाऊस, कुठं ओला तर कुठे कोरडा दुष्काळ असे विचित्र वातावरण निर्माण झाले आहे. मानवाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर तसेच पशुपक्ष्यांवर अनिष्ट परिणाम होतो आहे. शेती व शेतीपूरक व्यवसाय निसर्गाच्या लहरीपणामुळे धोक्यात आले आहेत. शहर, महानगरांचा विकास तसेच महामार्गाच्या निर्माणासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जाते. शासनाने कंत्राटदार आणि विकासकांना कापलेल्या झाडांच्या संख्ये इतक्यात झाडांची लागवड करुन, त्यांच्या देखभालीची जबाबदारी टाकावी. शासकीय योजने अंतर्गत, तसेच स्वयंस्फूर्तीने, सामान्य नागरिकांनी तसेच सामाजिक संघटनांनी लागवड केलेल्या झाडांच्या संवर्धनाची जबाबदारी शासनासह प्रत्येकाने घेतली पाहिजे. लागवड केलेल्या झाडांपैकी, किती झाडे जीवंत आहेत हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे नुसतं वृक्षारोपण करून चालणार नाही. त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. नाहीतर ग्रीन इंडिया मिशन आणि एक पेड मां के नाम वगैरे केवळ स्वप्नच राहतील.



**हेमंत जकाते, अकोला**

# पावसाची रिमझिम आणि बदलला शहराचा मिजाज

प्रतिनिधी ८ जुलै

**अकोला:** मुंबई पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात पाऊस धुमाकूळ घालत असताना शहरात मात्र गेल्या दोन दिवसांपासून रिमझिम पाऊस सुरू आहे. अद्यापही शहरवासी दमदार पावसाची प्रतीक्षा करत आहेत. परंतु रिमझिम पावसामुळे भीषण गर्मीचे वातावरण गायब झाल्याने व वातावरणात थंडावा निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे पावसाळ्याचे खरे गुपित म्हणजे त्याची सोबत म्हणूनच पाऊस हा केवळ एक ऋतू नसून आठवणी नाती आणि चवीचा एक उत्सव आहे ज्याची प्रत्येक जण आतुरतेने वाट पाहतो पावसाळ्याच्या पहिल्या सरी केवळ तापमानास कमी करत नाहीत तर संपूर्ण शहराचा मूडच बदलून टाकतात कडक उन्हानंतर आकाशातून पावसाच्या सरी कोसळू लागतात मातीचा गोड सुगंध भाजलेल्या मक्याचा वास आणि रस्त्यावरील विक्रेत्यांकडे तळल्या जाणाऱ्या गरमागरम पकोड्यांचा दरवळ सर्वांना मोहित



करतो संध्याकाळ जावळे येतात शहरातील गांधी चौक चौपाटी, सर्वोपचार रुग्णालयासमोरील चौपाटी, लेडी हार्डिंग परिसरातील चौपाटी, कौलखेड परिसरातील खाद्य विक्रेत्यांची दुकाने मोहम्मद अली मार्गावरील दुकाने, तसेच रस्त्यावरील अनेक छोट्या-मोठ्या खाद्य विक्रेत्यांच्या टपऱ्यांवर तसेच चहाच्या दुकानांवर मोठी गर्दी पहावयास मिळत आहे.

» रस्त्याच्या कडेला बसून पाऊस बघत मका खात आणि चहा पीत बसणे हे स्वर्ग सुखावून कमी नसल्याचे अनेकांचे मत आहे पावसाची निगडित या चवी आणि परंपरा आजही तितक्याच जिवंत आहेत म्हणूनच प्रत्येक पावसाळ्यात लोक नवीन आठवणी तयार करतात आणि जुन्या आठवणींना उजाळा देतात

## पाऊस सुरू होताच शहरात अनेक ठिकाणी तात्पुरते उभे राहतात खाद्यपदार्थांचे स्टॉल्स

» पावसाळा सुरू होताच शहरात गरमागरम मक्याचे कणसे विकणारे भुईमुगाच्या शेंगा विकणारे विक्रेते सक्रिय होतात त्याचबरोबर काही गाड्यांवर ओले वाटाणे सुद्धा भाजून मिळतात त्याची चव सुद्धा अप्रतिम असते पावसाळ्यात लोक मका खाल्ल्याशिवाय जात नाहीत त्याचप्रमाणे शहरातील चौपाटींवर गरमागरम आलू वडे कांदा भजी चा स्वाद खाद्य प्रेमींना आकर्षित करीत आहे पहिला पाऊस पडता ग्राहकांची रांग लागत आहेत.

# रेल्वे प्रवासात तिकीट विसरले!..... डोन्ट वरी

प्रतिनिधी ८ जुलै




अकोला : प्रवासाच्या घाईगडबडीत, प्रवासी अनेकदा रेल्वे आरक्षण काउंटरवरून (PRS) काढलेले आपले मूळ आरक्षित तिकीट घरी किंवा स्टेशनवर विसरतात. भारतीय रेल्वेच्या सध्याच्या नियमांनुसार अशा प्रकरणांमध्ये मदतीची तरतूद असली तरी, या परिस्थितीमुळे अनावश्यक चिंता निर्माण होते. जर एखादा प्रवासी काउंटरवरून काढलेले वैध आरक्षित तिकीट आणायला विसरला असेल आणि तो ट्रेनने प्रवास करत असेल, तर त्याचे कुटुंबीय किंवा अधिकृत प्रतिनिधी संबंधित प्रस्थान स्थानकाच्या स्टेशन मास्तरकडे मूळ तिकीट सादर करू शकतो.

तिकिटाची पडताळणी केल्यानंतर, रेल्वेच्या नियमांनुसार आवश्यक माहिती संबंधित पुढील स्थानकावर पाठवली जाते. त्यानंतर मूळ प्रवाशाला त्याचा पुढील प्रवास सुरू ठेवण्यासाठी मदत केली जाते. ही सुविधा केवळ रेल्वे आरक्षण काउंटरवरून (PRS) काढलेल्या मूळ आरक्षित तिकिटांसाठीच उपलब्ध आहे.

ही प्रक्रिया IRCTC द्वारे बुक केलेल्या ई-तिकिटांना लागू होत नाही. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना आवाहन केले आहे की, प्रवासादरम्यान आपण आपले काउंटर तिकीट आणायला विसरलो आहोत हे लक्षात आल्यास, त्यांनी तात्काळन ट्रेनमधील तिकीट तपासणी अधिकाऱ्याला (TTE) कळवावे आणि आपल्या कुटुंबीयांना संबंधित प्रस्थान स्थानकाच्या स्टेशन मास्तरकडे मूळ तिकीट त्वरित सादर करण्याची विनंती करावी, जेणेकरून रेल्वे नियमांनुसार वेळेत आवश्यक कारवाई करता येईल. प्रवाशांच्या सोयीसाठी, कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी किंवा मदतीसाठी रेल्वे हेल्पलाइन १३९ २४ तास उपलब्ध आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग प्रकरणी आरोपीस 3 वर्ष सश्रम कारावास, 10 हजार रुपये दंड

**अकोट** : झोपडीमध्ये जाऊन ११ वर्षिय अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणारा आरोपी गौतम अनंता मोरे (४०) रा. मिलींदनगर तेल्हारा यास ७ जुलै २०२६ रोजी अकोटचे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश बी.एम. पाटील यांनी ३ वर्ष सश्रम कारावास व १० हजार रूपये दंडाची व दंड न भरल्यास ३ महिने अधिकचा सश्रम कारावास, अशी शिक्षा सुनावली आहे. दंडाची रक्कम पिडीतेला नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी, असे आदेशात म्हटले आहे. तेल्हारा पोलिस स्टेशनच्या फाईलवरील या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तीवाद केला कि, २२ जून २०१६ रोजी पिडीतेने तेल्हारा पोलिसात फिर्याद दिली होती. १६ जून रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान फिर्यादी मुलगी तीच्या आजीसोबत घराच्या अंगणात झोपलेली असतांना आरोपी गौतम मोरे याने फिर्यादीचा विनयभंग केला. अशा फिर्यादीवरून आरोपी विरूध्द ३५४(अ), (ड) भादंवि ५०६ सहकलम ८/१२ पोस्को अ‍ॅक्ट अंतर्गत गुन्हा नोंद झाला. तपास अधिकारी पोउपनि करूणा आतराम यांनी आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी वकील अजित देशमुख यांनी या प्रकरणात ५ साक्षिदारांच्या साक्षी नोंदविल्या. त्यामध्ये पिडीता, तिची आजी, मुख्याध्यापक व तपास अधिकारी यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. सरकारी वकील अजित देशमुख यांनी युक्तीवाद करतांना आरोपीने केलेला गुन्हा हा अतिशय गंभीर आहे. आरोपीला दया दाखविल्यास समाजामध्ये चूकीचा संदेश जाऊ शकतो. पिडीतेचा परिवार हा मोलमजूरी करीता तेल्हारा येथे आला होता. पिडीता तीच्या आजीसोबत रात्री झोपली होती. मोलमजूरी करणारे लोक परिवारासह त्यांच्या झोपडीमध्ये झोपतात. त्यांच्या मुली सुध्दा सुरक्षित राहावयास पाहीजेत. त्यामुळे विकृत मनोवृत्तीच्या आरोपीने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न करून विनयभंग केला असल्याने कठोर शिक्षा देण्यात यावी. पैरवी म्हणून तेल्हारा पोलिस स्टेशनचे हवालदार गोपाल बुंदेले यांनी सहकार्य केले. दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश बी.एम. पाटील यांनी आरोपीला शिक्षा सुनावली.

# खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते टनकपुर-नांदेड ट्रेनला हिरवा झेंडा

प्रतिनिधी ८ जुलै



**अकोला:** खासदार अनुप भाऊ धोत्रे यांच्या हस्ते टनकपुर-नांदेड ट्रेनला अकोला रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म नंबर ३ वर हिरवा झेंडा दाखवून स्वागत करण्यात आले. यावेळी ड्रायव्हर आणि इंजिनिअर यांचा सन्मान करून प्रवाशांना मिठाई वाटण्यात आली.

उपमहापौर अमोल गोगे, अ‍ॅड. देवाशिष काकड, उन्मेष मालू, अमोल इंगळे, पवन महाले, किशोर कुचके, गणेश लोड, वैभव माहोरे, उमेश श्रीवास्तव, हर्षद चौधरी, मनीष बुढीले, संतोष पांडे, अभिमन्यू नळकांडे, मनोज शाहू, गोपाळ मुळे, अभिजीत कडू, अभिजीत भगत, संजय झाडोकार, व्यंकट ढोरे, संतोष डोंगरे, हर्षद भामरे, जाकीर हुसेन यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. या रेल्वे मुळे पशुपतीनाथ, नांदेड, औंढा नागनाथ, मथुरा येथे जाणाऱ्या भाविकांना आणि ओंकारेश्वरच्या प्रवाशांना या ट्रेनमुळे थेट सुविधा मिळणार आहे. नेपाळला जाणाऱ्या भक्तांसाठीही ही ट्रेन वरदान ठरेल. खासदार अनुप धोत्रे म्हणाले, या ट्रेनसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार. ही ट्रेन व्यापार, उद्योग आणि धार्मिक स्थळांना जोडणारी आहे. पाच राज्यांना जोडणारा हा रेल्वे प्रवास सुखकर आणि आनंददायी असेल." अकोला-खंडवा रेल्वे मार्ग प्रगतीपथावर आहे. २०१७ च्या अखेरपर्यंत हा मार्ग सुरू होण्याची शक्यता आहे. उत्तर भारत, दक्षिण भारत, पश्चिम भारत आणि पूर्व भारताला जोडणारा हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरेल.

## पाच राज्यांना जोडणारा रेल्वे प्रवास अधिक सुलभ

या आठवड्यात अकोला शहराला तीन नवीन ट्रेन मिळाल्याबद्दल रेल्वे प्रशासनाचे अभिनंदन. नांदेड रेल्वे सल्लागार समितीच्या बैठकीत अकोला स्टेशनच्या सुविधांचे प्रस्ताव मांडून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

"जय श्री कृष्ण, जय श्रीराम, हर हर महादेव, सत श्री अकाल, भारत माता की जय अशा घोषणांनी रेल्वे स्टेशन परिसर दुमदुमून गेला. या प्रसंगी ढोल-ताशांच्या गजरात मिठाईचे वाटप करण्यात आले.

# बिल्डर सूर्या यांच्या अपघातामागे घातपाताचा संशय?

प्रतिनिधी ८ जुलै

**अकोला** : शहरातील बिल्डर हाजी शफी सूर्या यांच्या भीषण अपघातानंतर आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. हा केवळ रस्ता अपघात नसून जीव घेण्याचा कट असू शकतो, असा गंभीर आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. त्यामुळे या घटनेची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. 3 जुलै रोजी रात्री 11.30 वाजता हाजी शफी सूर्या हे आपल्या वाहनातून जात असताना अज्ञात वाहनाने त्यांच्या गाडीला मागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर संबंधित वाहनचालकाने घटनास्थळावरून पलायन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच रामदासपेठ पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत हाजी शफी सूर्या यांना खासगी रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, कुटुंबीयांनी हा अपघात नसून पूर्वनियोजित हल्ला असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

# भास्कर दौलतराव जाधव यांचा अमृतमहोत्सवी सोहळा

प्रतिनिधी ८ जुलै



**अकोला** : शिव-फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे, मागील ५० वर्षापासून सतत कार्यरत कृतीशील विचारवंत आणि ३६ वर्ष स्वाभिमानाने शासकीय नोकरी करून, गटविकास अधिकारी या पदावरून निष्कलंकपणे सेवानिवृत्त झालेले आयु. भास्कर दौलतराव जाधव यांचा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा आज मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. जुन्या आरटीओ ऑफिस रोडवरील गुरुकृपा लॉन्समध्ये अतिशय हृद्य असा सत्कार सोहळा साजरा झाला

विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या तत्त्वावर आधारित भारताला दिलेल्या लोकशाहीच्या, भारतीय संविधानाला ७५ वर्षाचा दीर्घकाळ लोटलेला असतांना सुद्धा, अजूनही काही जातीवादी लोकं विषारी फुत्कार ओकत आहेत. याचे शल्य वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेल्या आयु. भास्कर जाधव यांच्या कवी मनाला सतत बोचत आहे. तेच 'शल्य' व तीच 'चीड' त्यांनी आपल्या 'युगंधरांच्या क्रांती गाथा' या १३० काव्यांच्या/गीतांच्या काव्यसंग्रहातून व्यक्त केली आहे. सदर काव्यसंग्रह त्यांचे ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या अमृतमहोत्सवी दिनाच्या शुभ मुहूर्तावर प्रकाशित झाला. अ‍ॅड. मनिषा भास्करराव जाधव, दिलीप दौलतराव जाधव, सौ. ज्योती दिलीपराव जाधव, डॉ. सौ. मंजुषा मिलिंद जाधव, मिलिंद भास्करराव जाधव, देवश्री दिलीपराव जाधव, दीपरत्न दिलीपराव जाधव आणि कुटुंबीयांचा आयोजनात सहभाग होता. कार्यक्रमाध्यक्ष आयुष्यमान सर्वश्री दिलीप दौलतराव जाधव संस्थापक अध्यक्ष, बहुजन संघर्ष सेना बुलडाणा होते. स्वागताध्यक्ष मिलिंद भास्करराव जाधव सदस्य, बहुजन विकास मंडळ अकोला, विशेष अतिथी सप्तखंजिरीवादक सत्यपाल चिंचोळकर महाराज अकोट, शेतकरी संघटनेचे माजी जिल्हा प्रमुख विजय सारभुकन, जेष्ठ विचारवंत प्रा. प्रभाकर पावडे नागपूर, भीमराव वैद्य नागपूर, राम पवार अमरावती, जगन्नाथ रेवस्कर पुणे, मनोज ओहेकर मुंबई, एन.एस. शिरसाट, विजय कौसल, अ‍ॅड. चंद्रकांत वानखडे अकोला, अशोक पटोकार अकोला, बाबा बिडकर नागपूर प्रामुख्याने उपस्थित होते. भास्कर जाधव यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले. तसेच समतेचा विचार अधिक बळकट करण्यासाठी तसेच आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी त्यांना उदंड आयुष्य लाभावे अशी प्रार्थना करण्यात आली.

# नागझरी नदीपात्रात बुडून 22 वर्षीय तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी ८ जुलै

**शेगाव** : तालुक्यातील नागझरी नदीपात्रात आंघोळीसाठी गेलेल्या २२ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी घडली.

योगेश सुरेश रसाळ (वय २२, रा. मोदीनगर, शेगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश रसाळ हा सोमवारी (दि. ६ जुलै) सायंकाळी सुमारे ४ वाजता नागझरी नदीवर आंघोळीसाठी गेला होता. यावेळी पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो नदीपात्रात बुडाला. घटनेनंतर त्याचा रात्रभर शोध घेण्यात आला. अखेर मंगळवारी (दि. ७ जुलै) लै) सकाळी सकाळी सुमारे सुमारे ७ ७वाजता त्याचा मृतदेह नदीपात्रात आढळून आला.घटनेची माहिती मिळाल्यानंतर मृताचा चुलता आनंद बळीराम रसाळ यांनी शेगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास सुरू आहे.

# लसीकरणानंतर चिमुकलीचा मृत्यू; शवविच्छेदन अहवालाकडे लक्ष

प्रतिनिधी ८ जुलै

**यवतमाळ** : नेर तालुक्यातील अजंती पारधी बेड्यावर राहणाऱ्या सहा महिन्यांच्या हिर मचेश भोसले हिचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. चिमुकलीचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसून, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे.

माहितीनुसार, हिरची आई मजेशा मचेश भोसले या मंगळवारी सकाळी मुलीला अजंती जिल्हा परिषद शाळेत आयोजित नियमित लसीकरणासाठी घेऊन गेल्या होत्या. लसीकरण झाल्यानंतर त्या मुलीसह घरी परतल्या. रात्री चिमुकली नेहमीप्रमाणे झोपली. मात्र, बुधवारी सकाळी ती कोणताही प्रतिसाद देत नसल्याचे लक्षात आले. त्यानंतर तिला तातडीने उपचारासाठी नेण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. तथापि, चिमुकलीच्या मृत्यूचा लसीकरणाशी संबंध असल्याचे कोणतेही अधिकृत कारण अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात आले. दरम्यान, या घटनेमुळे अजंती पारधी बेड्यावरील मूलभूत सुविधांचा प्रश्नही पुन्हा ऐरणीवर आला आहे. येथील अनेक कुटुंबे तुटक्या-फुटक्या झोपड्यांमध्ये वास्तव्यास असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही अनेक घरांपर्यंत वीज पोहोचलेली नसल्याचा स्थानिकांचा दावा आहे. पावसाळ्यात चिखल, अंधार, अपुऱ्या आरोग्य सुविधा आणि असुरक्षित वातावरणाचा सामना या समाजाला करावा लागत असल्याने प्रशासनाने तातडीने मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# महावितरण अमरावती परिमंडळाच्या मुख्य अभियंतापदी दिलीप दोडके रुजू

प्रतिनिधी ८ जुलै



**अमरावती** : महावितरणच्या अमरावती परिमंडळाच्या मुख्य अभियंतापदी दिलीप दोडके हे रुजू झाले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी तत्काळ अमरावती शहर विभागाचा आढावा घेत वीजपुरवठा, प्रलंबित कामे, तांत्रिक सुविधा आणि ग्राहकसेवा यासंदर्भात अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. परिमंडळातील प्रलंबित विकासकामे वेळेत पूर्ण करणे, वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करणे, ग्राहकांना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देणे आणि तक्रारींचे जलद निराकरण करणे यावर विशेष भर राहणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांची मुख्य कार्यालयात बदली झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. त्यांच्या जागी दोडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मूळ नागपूरचे असलेले दोडके यांनी येथील व्ही.आर.सी.ई. (आताचे व्हीएनआयटी) येथून अभियांत्रिकी पदवी पूर्ण केल्यानंतर सन १९९९ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य वीज मंडळात (एमएसईबी) सहाय्यक अभियंता म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे त्यांनी सेवेला सुरुवात केली. अकोला, भांडूप, नागपूर, मुंबई तसेच विविध क्षेत्रीय, प्रादेशिक आणि मुख्य कार्यालयातील जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी तब्बल २६ वर्षांचा समृद्ध प्रशासकीय व तांत्रिक अनुभव मिळविला आहे.

# शेतशिवारावर डल्ला मारणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## दारव्हा-दिग्रसमधील चार चोरींचा उलगडा

प्रतिनिधी ८ जुलै

**यवतमाळ** : दारव्हा व दिग्रस तालुक्यातील शेतशिवारात मोटार पंप, तांब्याच्या केबल आणि सोयाबीनची चोरी करून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून चार चोरीच्या गुन्ह्यांची उकल झाली आहे. आरोपीकडून १ लाख ५६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून टोळीतील अन्य दोघांचा शोध सुरू आहे. महमंद मुद्दसीर महमंद मुस्ताक (२५, रा. इस्लामपुरा, दारव्हा) असे आरोपीचे नाव आहे. दारव्हा व दिग्रस पोलीस ठाण्यांच्या हद्दीत शेतातील विहिरींवरील मोटार पंप, मोटारीतील तांब्याच्या वाइंडिंग वायर तसेच गोदामातील सोयाबीन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेतली. ६ जुलै रोजी दारव्हा परिसरात गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे इस्लामपुरा येथे सापळा रचण्यात आला. त्यावेळी विनाक्रमांकाच्या बर्गमन मोपेडवर तांब्याच्या तारांसह फिरत असलेल्या महमंद मुद्दसीर महमंद मुस्ताक (२५, रा. इस्लामपुरा, दारव्हा) याला ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशीत आरोपीने साथीदारांसह दारव्हा व दिग्रस परिसरात चार चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी दोन मोटार पंप, १५ किलो तांब्याची तार, सुमारे चार क्विंटल सोयाबीन आणि चोरीसाठी वापरण्यात आलेली बर्गमन मोपेड असा एकूण १.५६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तपासात आरोपींची चोरीची पद्धतही उघड झाली. टोळीतील सदस्य दिवसा शेतशिवाराची पाहणी करून रात्री शेतकरी नसल्याचा फायदा घेत विहिरींवरील मोटारी, तांब्याच्या केबल तसेच गोदामातील धान्य चोरत असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईमुळे दारव्हा पोलीस ठाण्यातील तीन आणि दिग्रस पोलीस ठाण्यातील एका चोरीच्या गुन्ह्याची उकल झाली आहे. दरम्यान, फरार असलेल्या अन्य दोन आरोपींचा शोध सुरू असून त्यांच्या अटकेनंतर आणखी काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे व त्यांच्या पथकाने केली. शेतशिवारात संशयास्पद व्यक्ती किंवा वाहन आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# टिळक रोडवरील जीवघेण्या खड्ड्याभोवती पाईपचे संरक्षण



प्रतिनिधी ८ जुलै

अकोला. टिळक मार्गावर उघड्या नाल्यात एक व्यक्ती गेल्यावर्षी वाहून गेला होता. यंदाचा पावसाळा सुरू होऊन देखील याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होते. या संदर्भात आरआरसी नेटवर्कने आवाज उठवला. तेव्हा कुठे महापालिका यंत्रणा जागी झाली. आता या ठिकाणी लोखंडी पाईपची चौकट लावली आहे. परंतु सध्याचे कवच अत्यंत तकलादू आहे. याठिकाणी मजबूत कठडे तयार करण्याची गरज आहे. अस्थाई उपाय कामाचे नाही असे नागरिकांचे म्हणणे आहे. पुन्हा दुर्घटना होऊ नये तसेच नागरिकांच्या जीवाचे रक्षण व्हावे या मुद्याला प्राधान्य द्यावे लागेल. धोकादायक नाल्याच्या भोवती संरक्षण कवच असलेच पाहिजे. त्याबाबत ढिलाई कामाची नाही ही जनभावना आहे. तसेच या ठिकाणी कमालीची अस्वच्छता दिसते. त्याकडे तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. हा भाग वर्दळीचा असल्याने नागरी सुरक्षेचा विचार करून प्राधान्य द्यावे लागणार आहे.

# मुंबईकरांसाठी पहिली गोड बातमी ; चिंतेचे ढग दूर, विहार तलाव ओसंडून वाहतोय

प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई :** मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी. पाणीटंचाईची चिंता आता दूर झाली आहे, कारण मुंबईला पाणीपुरवठा करणारा विहार तलाव आज रात्री ९ वाजता पूर्ण भरून ओसंडून वाहत आहे. जोरदार पावसामुळे हे शक्य झाले असून, मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पावसाने ओढ दिल्याने मुंबईकरांवर भीषण पाणी टंचाईचे ढग जमा झाले होते. त्यामुळे मुंबईकरांची चिंता वाढली होती. पण हे चिंतेचे ढग आता दूर झाले आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांपैकी एक असलेला विहार तलाव दुथडी भरून वाहू लागला आहे. आज रात्री ९ वाजताच तलाव भरला. तलाव क्षेत्र परिसरात पावसाने दमदार हजेरी लावल्याने हा तलाव भरून वाहू लागला आहे. त्यामुळे मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, अजून मुंबईला पाणीपुरवठा करणारे सहा तलाव भरायचे बाकी आहेत. या तलाव क्षेत्रात जोरदार पाऊस असून हे तलावही



लवकरच भरतील अशी मुंबईकरांना आशा आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ तलावांपैकी आणि बृहन्?मुंबई महापालिका क्षेत्रातच असणा-या दोन तलावांपैकी एक असणारा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा 'विहार तलाव' आज दिनांक ०७ जुलै २०२६ रोजी रात्री ९ वाजता ओसंडून वाहू लागला आहे?. हा तलाव गेल्यावर्षी दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी पूर्ण भरुन वाहू लागला होता. २७,६९८ दशलक्ष लीटर उपयुक?त जलधारण क्षमता असणारा हा तलाव वर्ष २०२४ मध्ये दिनांक २५ जुलै रोजी ओसंडून वाहू लागला होता. तर त?या आधीच?या वर्षी म?हणजेच वर्ष २०२३ मध?ये दिनांक २६ जुलै रोजी विहार तलाव ओसंडून वाहू लागला होता.

बृहन?मुंबई महापालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांपैकी विहार तलाव हा दोन सर्वात लहान तलावांपैकी एक असून यापैकी दुसरा तुळशी तलाव हा सर्वात लहान तलाव आहे. विहार तलावातून दररोज सरासरी ९० दशलक्ष लीटर (९ कोटी लीटर) एवढ्या पाण?याचा पुरवठा केला जातो. गेल्या काही दिवसात या तलावाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे हा तलाव भरून वाहू लागला आहे, अशी माहिती महानगरपालिकेच्या जल अभियंता खात्याद्वारे देण्यात आली आहे. सन १८५९ मध्ये ६५ लाख रुपये खर्चून विहार तलाव बांधण्यात आला आहे.बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयापासून साधारणपणे २८.९६ किलोमीटर अंतरावर हा तलाव आहे. या तलावाचे बांधकाम सन १८५९ मध्ये पूर्ण झाले.या तलावाच्या बांधकामासाठी सुमारे ६५.५ लाख रुपये एवढा खर्च तेव्हा आला होता. या तलावाचे पाणलोट क्षेत्र हे सुमारे १८.९६ किलोमीटर असून तलाव पूर्ण भरलेला असल्यास पाण्याचे क्षेत्रफळ हे सुमारे ७.२६ चौरस किलोमीटर एवढे असते. तलाव पूर्ण भरलेला असताना तलावाचा उपयुक?त पाणीसाठा हा २७,६९८ दशलक्ष लीटर अर्थात २,७६९.८० कोटी लिटर एवढा असतो. हा तलाव पूर्ण भरून वाहू लागल्यानंतर या तलावाचे पाणी हे मिठी नदीला जाऊन मिळते.

## यंदा वाऱ्याचे प्रमाण जास्त असल्याने झाडांचे सर्वाधिक नुकसान, अश्विनी भिडेंचं मत





प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई:** फूटपाथखालून जाणाऱ्या सेवा वाहिन्या, काही ठिकाणी बसवलेले पेव्हर ब्लॉक ही झाडांच्या पडझडीमागे काही कारणे आहेत. याशिवाय यंदा पावसात वाऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने झाडांचे सर्वाधिक नुकसान झाले, असे मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी सांगितले.

मुंबईत यंदाच्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात झाडांची पडझड होत आहे. झाडे किंवा फांद्या पडल्याने काही जणांचा मृत्यूही झाला आहे. झाडांच्या बुंध्यालगत असलेले काँक्रीटीकरण आणि त्यामुळे झाडांचे नुकसान होऊन त्याची पडझड होत असल्याचे मत तज्ज्ञांकडून मांडले जात आहे. मात्र, झाडांच्या पडझडीला काँक्रीटीकरण जबाबदार नसल्याचे मत मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी व्यक्त केले आहे.

'वाऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने झाडांचे सर्वाधिक नुकसान' महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी मंगळवारी महापालिका मुख्यालयात महापालिकेशी संबंधित विविध विषयांवर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्या म्हणाल्या की, मुंबईत अनेक झाडे रस्त्यावर नसून, रस्त्याच्या बाजूला फूटपाथवर आहेत. फूटपाथखालून जाणाऱ्या सेवा वाहिन्या, काही ठिकाणी बसवलेले पेव्हर ब्लॉक ही काही कारणे झाडांच्या पडझडीमागे आहेत. याशिवाय यंदा पावसात वाऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने झाडांचे सर्वाधिक नुकसान झाल्याचे भिडे यांनी सांगितले.

'२०१८च्या वृक्षगणनेनुसार मुंबईत २९ लाख ७५ हजार झाडे आहेत. यापैकी रस्त्याच्या दुतर्फा दोन लाख झाडे आहेत. रस्त्यालगतची झाडे खूप धोकादायक असतात. झाडांलगत असलेले पाणी वाहून गटारात जाणे किंवा इतर वाहिन्या रस्त्याच्या खालून गेल्यानेही झाडांच्या मुळांना धोका पोहोचतो. रस्त्यांचे काँक्रीटीकरण केले जाते, काही ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविले जातात. अशा ठिकाणी असलेल्या झाडांच्या मुळांना पाणी पोहोचविणे गरजेचे असते. संबंधित झाडांची मुळे कुठपर्यंत पसरलेली असतील याचा अंदाज घेऊन तिथपर्यंत छिद्रे करून त्यावर जाळी लावून पाणी टाकता येईल का, याबाबत महानगरपालिकेचा विचार सुरू आहे. असा प्रयोग यापूर्वी मलबार हिल परिसरात करण्यात आला होता', असे भिडे यांनी सांगितले.

'अनेक झाडे ५० ते ६० वर्षे जुनी आहेत. त्यांची मुळे खूप खोलवर गेली आहेत. यासाठी रस्ते बांधत असताना कोणती काळजी घ्यावी यासाठी आमच्या सुनिश्चित कार्यपद्धती आहेत. त्यासाठी तज्ज्ञांचे मत जाणून घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. जमिनीखालून विविध यंत्रणांच्या वाहिनी गेलेल्या असतील तर कामे करतानाही योग्य ती काळजी घेतली जाईल', असेही भिडे यांनी स्पष्ट केले.

## ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसात घट

प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई:** जुलै च्या सुरुवातीला मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात अति वृष्टी झाली असली तरी राज्यातील विविध भागांमध्ये आता पर्यंत सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला आहे, विशेषतः खानदेश (धुळे आणि नंदुरबार जिल्हे), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्हे), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भाग.

८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्याचा अंदाज असून, ही परिस्थिती किमान पुढील १० दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. या दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे. तसेच, राज्यातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्राथमिक अंदाजानुसार जुलै महिन्याच्या दुसऱ्या अर्ध्यात पहिल्या अर्ध्याच्या तुलनेत पावसाचे प्रमाण कमी राहू शकते. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीचे नियोजन करावे. राज्यातील ज्या भागांमध्ये अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही, तिथे शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे

## 'त्या' जवानाने प्रेमभंगातून केली आयुष्याची अखेर!

प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई :** मुंबईतील लोकभवन येथे बंदोबस्तासाठी तैनात असलेला एसआरपीएफचा जवान कौस्तुभ सांगळे (२६) याने प्रेमभंगातून आयुष्याची अखेर केल्याचे समोर आले आहे. प्रेमप्रकरणात अपयशी ठरल्याने आलेल्या नैराश्यातून कौस्तुभ याने हे पाऊल उचलल्याचे त्याच्याकडे सापडलेल्या डायरीतून स्पष्ट झाले आहे.

मूळचा नाशिकच्या लासलगावचा रहिवासी असलेला कौस्तुभ हा एसआरपीएफच्या घटक १६ (कोल्हापूर) तुकडीत कार्यरत होता. सोमवारी रात्री साडेआठ वाजताच्या



सुमारास लोकभवन येथे कर्तव्य बजावताना त्याने शासकीय रायफलमधून स्वतःवर गोळी झाडून घेतली. घटनेनंतर मलबार हिल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी कौस्तुभचे सामान तपासले असता, त्यात एक डायरी सापडली. त्यामध्ये फसलेल्या प्रेमसंबंधांमुळे तो प्रचंड निराश होता, हे स्पष्ट झाले. त्याच नोंदी त्याची मृत्यूपूर्व लिहिलेली नोट म्हणून ग्राह्य धरण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयात नेमणुकीला असलेल्या एका महिला कॉन्स्टेबलसोबत कौस्तुभ याचे दोन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. दोघांची ओळख तीन वर्षांपूर्वी पोलिस प्रशिक्षण अकादमी येथे झाली होती. नोकरीवर रुजू होताच कौस्तुभने तरुणीकडे लग्नाची मागणी केली. मात्र महिला कॉन्स्टेबलने त्याची मागणी धुडकावून लावत संवाद कमी केला. यामुळे कौस्तुभ अस्वस्थ झाला. त्याने संदेश पाठवून, कॉल करून तिची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. कौस्तुभ मागे लागल्याने तिने पोलिस ठाण्यात लेखी तक्रारही दिली होती. त्यातच दोन महिन्यांपूर्वी तिचे लग्न जमल्याचे समजल्याने त्याला धक्का बसला होता.

## डान्सबार चालवण्यासाठी ऑर्केस्ट्राचा आधार? फडणवीस सरकारची कडक भूमिका ; महत्वपूर्ण विधेयक मंजूर

प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई :** ऑर्केस्ट्राच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर डान्सबारना आळा घालण्यासाठी सरकारने महत्त्वाचं सुधारणा विधेयक विधानसभेत मंजूर केलं आहे. या निर्णयामुळे नेमके कोणते नियम बदलणार?

राज्यातील ऑर्केस्ट्रा बारसाठी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डान्सबार चालवणाऱ्यांवर आता अधिक कडक कारवाई होणार आहे. यासाठीचं सुधारणा विधेयक आज विधानसभेत मंजूर झालं. त्यामुळे ऑर्केस्ट्राच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांवर लगाम लावण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. आतापर्यंत ऑर्केस्ट्रा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार परवाना दिला जात होता. मात्र, अनेक ठिकाणी याच परवान्याचा आधार घेऊन प्रत्यक्षात डान्सबार चालवले जात असल्याच्या तक्रारी गृहविभागाकडे आल्या होत्या. ही पळवाट बंद करण्यासाठी



सरकारने आता ऑर्केस्ट्रालाही डान्सबारविरोधी कायद्याच्या कक्षेत आणण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमासह २०१६ च्या डान्सबारविरोधी कायद्यातही बदल करण्यात येणार आहेत. विधानपरिषदेची मंजुरी आणि राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर हा कायदा लागू होईल. सरकारच्या मते, या बदलामुळे ऑर्केस्ट्राच्या नावाखाली नियम मोडणाऱ्या बार मालकांवर थेट कारवाई करता येणार आहे. महिलांचं शोषण रोखणं, त्यांच्या सन्मानाचं संरक्षण करणं आणि कायद्यातील पळवाट बंद करणं, हा या निर्णयामागचा उद्देश असल्याचं सरकारने स्पष्ट केल आहे. राज्यात अनेक ठिकाणी ऑर्केस्ट्राच्या नावाखाली नेमकं काय सुरू आहे, यावर यापुढे प्रशासनाचं अधिक लक्ष असणार आहे. नियमांचं उल्लंघन झाल्याचं आढळल्यास संबंधितांवर डान्सबारविरोधी कायद्यानुसार कारवाई केली जाईल. त्यामुळे या निर्णयाचा राज्यातील ऑर्केस्ट्रा बार व्यवसायावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. सरकारचा दावा आहे की, या बदलामुळे ऑर्केस्ट्राच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवता येईल. अनेक ठिकाणी परवान्याचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत होत्या. त्यामुळे अशा प्रकरणांवर कारवाई करताना कायद्यातील अडचणी दूर करण्यासाठी ही सुधारणा करण्यात आल्याचं सरकारने स्पष्ट केलं आहे. आता संबंधित बारची तपासणी, परवान्यांच्या अटींची पडताळणी आणि नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणं प्रशासनाला अधिक सोपं होणार असल्याचंही सरकारचं म्हणणं आहे.

## कामगार कायद्यांच्या राज्य नियमावलीवर कामगार संघटनांशी चर्चा करून अहवाल केंद्रास पाठवा

### कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांचे निर्देश

प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई:** भारत सरकारच्या चार नवीन श्रम संहितांच्या अनुषंगाने राज्य शासनाने तयार केलेल्या 'महाराष्ट्र वेतन संहिता नियम', 'महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम', 'महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती नियम' आणि 'महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम' या चारही नियमावलींवर कामगार आणि कर्मचारी संघटनांशी कामगार विभागाच्या चार स्वतंत्र तज्ज्ञ समित्यांनी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीसोबत चर्चा घडवून आणावी. कामगार संघटनांचे मत आणि सूचना पूर्णपणे जाणून घेतल्यानंतरच याचा एकत्रित संयुक्त अहवाल केंद्रीय श्रम मंत्रालयाला पाठवावा, असे निर्देश कामगार मंत्री ?ड. आकाश फुंडकर यांनी दिले.



कामगार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कामगार विभागाच्या अप्पर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, उपसचिव दीपक पोकळे, स्वप्नील कापडणीस, रोशनी कदम यांच्यासह 'कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती'चे अध्यक्ष डॉ. कैलास कदम आणि सरचिटणीस गोविंदराव मोहिते प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय कामगार चळवळीतील प्रमुख संघटनांचे प्रतिनिधी म्हणून इंटक, आयटक, एचएमएस, सीटू, एआयसीसीटीयु, एनटीयुआय आणि बीकेएस या संघटनांचे पदाधिकारीही या बैठकीस उपस्थित होते. बैठकीदरम्यान कामगार मंत्री म्हणाले, नवीन श्रम संहितांच्या अंमलबजावणीपूर्वी राज्यातील कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. यासाठीच शासनाने मसुदा नियमावली जाहीर करून त्यावर हरकती व सूचना मागविल्या आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता राहावी म्हणून कामगार विभागाच्या वतीने चार स्वतंत्र तज्ज्ञ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. या तज्ज्ञ समित्यांनी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीसोबत समन्वय साधून सविस्तर चर्चा करावी. ही चर्चा केवळ नाममात्र न ठरता प्रत्येक मुद्द्यावर सखोल व्हावी, यासाठी कामगार विभागाने तातडीने बैठकांचे अधिकृत वेळापत्रक जारी करावे, अशा सूचना मंत्र्यांनी विभागला दिल्या. या संवादाच्या माध्यमातून कामगार संघटनांनी मांडलेल्या सर्व रास्त मागण्या, सूचना आणि आक्षेप नोंदवून घेतले जातील. कामगारांचे हक्क आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेला कुठेही बाधा पोहोचणार नाही, याची काळजी राज्य शासन घेईल, असेही कामगार मंत्री म्हणाले. तज्ज्ञ समिती आणि कामगार संघटना यांच्यातील या विस्तृत चर्चेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, त्यातून समोर आलेल्या निष्कर्षांचा आणि सूचनांचा अंतर्भाव करून एक सर्वसमावेशक एकत्रित संयुक्त अहवाल तयार केला जाईल. हा अंतिम अहवाल पुढील मंजुरी आणि कार्यवाहीसाठी केंद्रीय श्रम मंत्रालयाकडे सुपूर्द करण्यात येईल, असे कामगार मंत्र्यांनी स्पष्ट केले.

## मातोश्रीवर हायव्होल्टेज बैठक, 24 आमदार आले, पण निष्ठावान नेत्याची दांडी चर्चेत

प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई :** सचिन अहिर यांनी ठाकरेसेनेला जय महाराष्ट्र करुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतरची ही पक्षाची पहिलीच बैठक होती

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी 'मातोश्री' येथे बोलावलेल्या पक्षातील आमदारांच्या बैठकीला एक आमदार अनुपस्थित होता. तर उर्वरित १९ विधानसभा आमदार आणि पाचही विधान परिषद सदस्य या बैठकीला हजर असल्याची माहिती आहे.

ठाकरेसेनेचे परभणीचे आमदार राहुल पाटील हे उद्धव ठाकरेंनी बोलावलेल्या बैठकीला अनुपस्थित होते; कौटुंबिक कार्यक्रमामुळे आपण बैठकीला उपस्थित राहू शकत नाही, असे त्यांनी पक्षाला कळवल्याचे समजते. गेल्या आठवड्यात विधान परिषदेचे सदस्य सचिन अहिर यांनी ठाकरेसेनेला जय महाराष्ट्र करुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतरची ही पक्षाची पहिलीच बैठक होती. सचिन अहिर यांची थेट विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी वर्णी लागली आहे. विशेष म्हणजे शिंदेंच्या 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा खासदार फुटले आणि त्यांनी शिंदेसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला.



त्यामध्ये परभणीचे खासदार संजय जाधव यांचाही समावेश आहे. परभणीतील खासदाराच्या मागोमाग परभणीचाच आमदारही बैठकीला गैरहजर असल्याने हे कनेक्शन जोडले जात आहे. महत्त्वाची बाब ही की राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, म्हणजेच २२ जून रोजी उद्धव यांनी उबाठाच्या आमदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला २६ पैकी चार आमदार अनुपस्थित होते. राहुल पाटील हे २२ जूनच्या बैठकीलाही गैरहजरच होते.

डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील हे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे परभणी विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार आहेत. ते ठाकरे गटातील निष्ठवान नेते म्हणून ओळखले जातात.

राहुल पाटील हे परभणी विधानसभा मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. २०१४, २०१९ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी विजय मिळवलेला आहे. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी पुकारलेल्या बंडानंतरही ते ठाकरेंसोबत राहिले. निष्ठेचं फळ म्हणून त्यांना २०२४ मध्ये उमेदवारीही मिळाली आणि जनतेने त्यांना निवडूनही दिलं.

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि सामान्य नागरिकांचा बळी गेला आहे; यासंदर्भातील प्रश्न विधिमंडळात अत्यंत आक्रमकपणे आणि पद्धतशीरपणे मांडावेत, अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी आमदारांना दिल्या. सहा खासदारांनी पक्ष सोडणे आणि सचिन अहिर यांनी शिंदेसेनेत प्रवेश करणे यांमुळे निर्माण झालेल्या संकटाच्या काळात पक्षाने एकजूट दाखवावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच, बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांमध्ये जाऊन पक्ष कार्यकर्त्यांसोबत बैठका घ्याव्यात, अशा सूचनाही उद्धव यांनी आमदार आणि विधान परिषद सदस्यांना दिल्या. उद्धव ठाकरेंना यंदा पहिला धक्का १४ जून रोजी बसला, जेव्हा त्यांनी बोलावलेल्या बैठकीला लोकसभेचे केवळ चारच खासदार उपस्थित राहिले. बैठकीला गैरहजर राहिलेले पाच खासदार आणि बैठकीला उपस्थित असलेला आणखी एक खासदार नंतर शिंदेंच्या शिवसेनेत सामील झाले. पक्ष सोडून जाण्याचे हे सत्र रोखण्याच्या हताश प्रयत्नांतून ठाकरे आपल्या पक्षाचे आमदार आणि नेत्यांसोबत बैठका घेत आहेत. मात्र पक्षातून होणारी ही गळती सुरूच आहे.

## मुंबईत पाऊस ओसरला, पुणे-मुंबई वाहतूक आजही बंद

प्रतिनिधी ८ जुलै

**मुंबई :** वसई-विरार उपनगरात कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने गेल्या दोन दिवसांपासून केवळ रस्तेच पाण्याखाली आणले नाहीत, तर हजारो कुटुंबांचे आयुष्यही अंधारात ढकलले आहे. सोमवारी सुरू झालेली पूरस्थिती दुसऱ्या दिवशी अधिकच गंभीर झाली. सखल भागात साचलेले पाणी, घरात शिरलेले मैलापाणी आणि सलग तिसऱ्या दिवशीही गायब झालेली वीज यामुळे स्थानिकांचे जनजीवन पूर्णपणे कोलमडले आहे. पण आता बऱ्यापैकी नालासोपाऱ्यात जनजीवन पूर्वपदावर येत असल्याचं दिसत आहे. तसेच नालासोपाऱ्यातील पाणी ओसरायला आता सुरुवात झाली आहे. राज्यातील बहुतांश भागात सध्या पावसाने रौद्ररूप धारण केल्याचे चित्र आहे. अशातच गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या विविध भागांत पावसानं अक्षरशः तांडव सुरू केले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. सध्या अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली असून नद्या आणि नाले ओसंडून वाहत असून नद्यांना पूर आल्याचे चित्र आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135